दैनिक आरंभ मराठी
www.arambhmarathi.com
दैनिक धाराशिव वर्ष 2 रे
शुक्रवार16 मे 2025
RNI NO -2023/90078
पाने 04 किंमत रू 5
अंक 95




तापमानाचा उच्चांक गाठलेल्या महाराष्ट्रात गेल्या चार दिवसांपासून वातावरणात बदल झाला आहे. काही भागात वादळी वाऱ्यासह मान्सूनपूर्व पाऊस बरसत आहे. त्यामुळे वातावरणातील उकाडा कमी झाला असून,तापमानात घट झाली आहे. या दरम्यान आकाशात ढगांच्या विविध रंगसंगती पाहायला मिळत आहेत.शिक्षिका सुवर्णा शिनगारे-जावळे यांनी पुण्यातील हिंजवडी भागात टिपलेले मनोहारी छायाचित्र.

# नेत्यांनो,याचं श्रेय घेणार का ? कचऱ्यामुळे शहरात जागोजागी दुर्गंधी

## पालिकेची झोळी रिकामी, मुख्याधिकारी सुटीवर,६कोटी थकल्याने स्वच्छता करणाऱ्या कंपनीने गाशा गुंडाळला

आरंभ मराठी / धाराशिव

धाराशिव शहरात मागील चार दिवसांपासून स्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनला आहे. पालिकेची तिजोरी रिकामी झाल्यामुळे कंपनीचे थकीत बील काढण्यासाठी पैसेच नसल्याने स्वच्छतेचे कंत्राट घेतलेल्या कंपनीने चार दिवसांपासून काम बंद केले आहे. त्यामुळे शहरात सर्वत्र स्वच्छतेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, अवकाळी पावसामुळे साथीचे रोग पसरण्याची भीती निर्माण झाली आहे. कंपनीचे जवळपास सहा कोटींचे बील थकल्यामुळे कंत्राट घेतलेल्या कंपनीने बील द्या अन्यथा काम बंद अशी भूमिका घेतल्यामुळे शहरातील गल्लोगल्ली कचऱ्याचे अक्षरशः ढीग साचले आहेत. त्यातच मुख्याधिकारी सुट्टीवर असल्यामुळे हा प्रश्न कधी सुटणार ? असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.एरव्ही न झालेल्या विकासाचे फ्लेक्स लावून श्रेय घेणाऱ्या राजकीय मंडळींनी शहराला कचऱ्यात ढकलल्याचे श्रेय मात्र घेतलेले दिसत नाही.

धाराशिव शहरात स्वच्छतेचा प्रश्न बाराही महिने गंभीर असतो. कोट्यवधी रुपयांचे टेंडर देऊनही शहरातील कचऱ्याची समस्या मिटलेली नाही. त्यातच गेल्या चार दिवसांपासून स्वच्छतेचे कंत्राट घेतलेल्या कंपनीने पालिकेने वेळेत बील न दिल्यामुळे स्वच्छतेचे काम करण्यास नकार दिला आहे. त्यामुळे शहरात घाणीचे साम्राज्य पसरले असून, अवकाळी पावसामुळे या घाणीचे रूपांतर रोगराईत होण्याची शक्यता आहे. मागील चार दिवसात शहरातील प्रमुख चौक वगळता एकाही प्रभागातील कचरा उचलला गेला नाही. तसेच शहरातून घंटागाडी फिरत नसल्यामुळे घरातील कचरा नेमका कुठे टाकावा असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. त्यातच अवकाळी पाऊस मोठ्या प्रमाणावर पडल्यामुळे गल्ली-बोळात दुर्गंधी पसरली आहे. यामुळे साथीचे रोग पसरण्याची भीती निर्माण झाली आहे.



### कंपनीचे सहा कोटी रुपये थकले

नगर पालिकेने शहर स्वच्छतेसाठी २९ जानेवारी २०२४ रोजी एन डी के हॉस्पिटॅलिटी, एल एल पी,(फलटण) कंपनीला स्वच्छतेचे कंत्राट दिले आहे.करारानुसार वार्षिक ८ कोटी ७९ लाख रुपयांचा खर्च फक्त स्वच्छतेसाठी केला जाणार होता. हा खर्च महिन्याला ७३ लाख २५ हजार रुपये तर दिवसाला तब्बल २ लाख ४४ हजार रुपये आहे.करारानुसार स्वच्छतेसाठी सर्व वार्डमध्ये मिळून दररोज २४० कर्मचारी काम करतील असे म्हटले आहे. कचरा उचलण्यासाठी पालिकेच्या २० घंटागाडी आणि कंपनीच्या मालकीच्या १० घंटागाडी अशा एकूण ३० घंटागाडी दररोज कचरा उचलण्यासाठी शहरातील सर्व भागात फिरून कचरा गोळा करतील असेही या करारात म्हटलेले आहे.



### पेमेंट थकल्यामुळे कंपनीचे काम बंद

मी नवीनच चार्ज घेतला आहे. त्यामुळे मला या विषयाची अधिक माहिती नाही. फक्त पेमेंट थकल्यामुळे कंपनीने काम बंद केलेले आहे. मुख्याधिकारी यांना हा विषय कळवला आहे. या प्रश्नावर त्याच योग्य निर्णय घेतील.

– गणेश मेहर,
स्वच्छता निरीक्षक,
नगरपालिका,धाराशिव.

# जिल्हा परिषदेच्या वार्षिक बदली प्रक्रियेत ८० कर्मचाऱ्यांच्या बदल्या

आरंभ मराठी/ धाराशिव

जिल्हा परिषदेच्या वार्षिक बदली प्रक्रियेत गट क आणि गड ड श्रेणीच्या एकूण ८० कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या. महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय दिनांक १५ मे, २०१४ अनुसार ज्या तालुक्यात नेहमीच पदांची रिक्तता जिल्हयाच्या सरासरीपेक्षा जास्त असते अशा भागातील रिक्त पदे प्रशासकीय / विनंती बदलीने भरणे तसेच ज्या कर्मचाऱ्यांनी एकाच भागात जास्त वर्षे सेवा केलेली आहे त्यांना उर्वरित भागात जाण्याच्या दृष्टीने व प्राधान्यक्रमात नमूद केलेल्या कर्मचाऱ्यांना सोयीच्या ठिकाणी जाणे सुलभ व्हावे या उद्देशाने जिल्हा परिषदेतील गट क व गट ड मधील विविध संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय व विनंती बदल्यांबाबत शासन धोरण ठरविण्यात आले आहे. त्यानुसार




दिनांक १४ व १५ मे, २०२५ रोजी जिल्हा परिषद स्थायी समिती सभागृहामध्ये या वर्षाची बदली प्रक्रिया संपन्न झाली. शासन बदली धोरणानुसार यावर्षी जिल्हा परिषद अंतर्गत सामान्य प्रशासन विभाग-२८, वित्त विभाग-५, पंचायत विभाग-११, महिला व बाल विकास-४, पशुसंवर्धन-७, शिक्षण (प्राथ.)-३, आरोग्य-१७ बांधकाम विभाग-१, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग-३, कृषी विभाग-१ अशी विविध विभागामधील ४१ कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बदली व ३९ कर्मचाऱ्यांच्या विनंती बदली मिळून एकूण ८० कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्या. सदर बदली प्रक्रियेच्या वेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.) सुर्यकांत भुजबळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) शाम गोडभरले, इतर खाते प्रमुख, गटविकास अधिकारी, पंचायत समिती व इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# रिक्षाच्या धडकेत ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू

आरंभ मराठी/कळंब

रिक्षाने धडक दिल्यामुळे ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाल्याची घटना कळंब तालुक्यातील हावरगाव शिवारात घडली. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, प्रकाश दगडू कोल्हे (वय ७५ वर्षे, रा. हावरगाव ता. कळंब) हे लुना मोटरसायकल (क्र एमएच २५ झेड ६९३९) वरुन जात होते. दरम्यान फाटक पेट्रोल पंपासमोर कळंब येथे ॲपे रिक्षा (क्र एमएच १२ एफडी ४९९८) च्या चालकाने त्याच्या ताब्यातील ॲपे रिक्षा हा हायगयी व निष्काळजीपणे चालवून प्रकाश कोल्हे यांच्या मोटरसायकलला धडक दिली. या अपघातात प्रकाश कोल्हे गंभीर जखमी होवून मयत झाले. तर ॲपे रिक्षा चालकाने जखमीस उपचार कामी घेवून न जाता तसाच निघून गेला. यासंबधी फिर्यादी दत्ता प्रकाश कोल्हे (वय ४८ वर्षे, रा. हावरगाव) यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या.सं. कलम २८१, १२५(अ),१२५(बी), १०६(१) सह कलम १३४ (अ) (ब), १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# तुळजाई कृषी उत्पन्न वृद्धी अभियान परिवर्तनाची नांदी, प्रकल्पासाठी प्रस्तावित जागेची पाहणी

## आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती

आरंभ मराठी/तुळजापूर

तुळजाई कृषी उत्पन्न वृद्धी अभियान जिल्ह्यातील शेतकरी बांधवांसाठी नव्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनाची नांदी आहे. तुळजापूर तालुक्यातील माळुंब्रा आणि मसला शिवारात १००० एकर क्षेत्रावर हा महत्वपूर्ण प्रकल्प सुरू होत आहे. त्याच्या कार्यवाहीस प्रारंभ झाला आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील अद्ययावत बाबींच्या मदतीने शेतकरी बांधवांचे उत्पन्न दीडपट वाढविण्याच्या दृष्टीने मित्रच्या माध्यमातून हे क्रांतिकारी अभियान आपण हाती घेतले आहे. या क्षेत्रातील तज्ञ मान्यवरांनी गुरुवारी जागेची पाहणी केली असल्याची माहिती आमदार तथा मित्रचे उपाध्यक्ष राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.मित्रच्या नियामक मंडळाच्या बैठकीत जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्न वृद्धीच्या अनुषंगाने तुळजाई कृषी उत्पन्न वृद्धी अभियान अर्थात या अभूतपूर्व प्रकल्पाची मांडणी आपण केली होती. मित्रचे अध्यक्ष तथा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रकल्पाचे महत्व जाणून घेत तातडीने मित्रचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविणसिंह परदेशी यांना याबाबत कार्यवाही सुरू करण्याचे निर्देश २४ एप्रिल रोजी दिले होते. त्यानुसार १३ मे रोजी मुंबई येथील मित्रच्या कार्यालयात आपल्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत



पुढील टप्प्याबाबत प्रत्यक्ष कार्यवाही सुरू करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्याचाच भाग म्हणून गुरुवारी या क्षेत्रातील तज्ञ मंडळीनी तुळजापूर तालुक्यातील माळुंब्रा आणि मसला शिवारातील १००० एकर जागेची पाहणी केली आहे. यावेळी उपस्थित शेतकरी बांधवांसोबत चर्चा करून या महत्वपूर्ण प्रकल्पाबाबत उपस्थित तज्ञ मान्यवर मंडळींनी माहिती दिली.

# कृषी सहायकांनी उपसले काम बंद आंदोलनाचे हत्यार

## जिल्ह्यातील २७९ कृषी सहायक आंदोलनात सहभागी

आरंभ मराठी/ धाराशिव

कृषी विभागासमोर ठेवलेल्या मागण्या मान्य होत नसल्यामुळे राज्यातील साडेआठ हजार कृषी सहायकांनी गुरुवार (ता. १५) पासून कामबंद आंदोलन पुकारले आहे. या आंदोलनात धाराशिव जिल्ह्यातील २७९ कृषी सहायक सहभागी झाल्यामुळे ऐन खरिपाच्या तोंडावर कृषी विभागाचे कार्यालयीन काम काज विस्कळीत होणार आहे. शेतकऱ्यांची गैरसोय होणार असल्यामुळे आंदोलन करू नये, असे आवाहन प्रशासनाने केले असले तरी कालपासून कामबंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे. कृषी विभागात क्षेत्रीय पातळीवर सर्वांत मोठे मनुष्यबळ कृषी सहायकांचे आहे. सध्या 'महाराष्ट्र राज्य कृषी सहायक संघटना' ही आंदोलनाचे नेतृत्व करत आहे. या संघटनेने दोन महिन्यापूर्वीच प्रशासनासमोर विविध मागण्या ठेऊन कामबंद आंदोलन करणार असल्याचे स्पष्ट केले होते. आंदोलन काळात कृषी सहायक नियमित कामांवर बहिष्कार घालणार आहेत. मात्र शेतकऱ्यांना तातडीने मदतीची गरज असल्यास सहायक हस्तक्षेप करतील असे संघटनेने स्पष्ट केले आहे. हे आंदोलन शेतकऱ्यांवर अन्याय करण्यासाठी नसून, शासनाचे लक्ष वेधण्यासाठी असल्याचेही काही कृषी सहायकांचे म्हणणे आहे.



### पदनाम व लॅपटॉपच्या मुद्द्यावर नाराजी

महाराष्ट्र राज्य कृषी सहायक संघटनेच्या एकूण १५ मागण्या आहेत. त्यापैकी पदनाम बदल व लॅपटॉप वितरण अशा दोन मागण्या तात्काळ सुटल्या तरी आंदोलन मागे घेतले जाईल असे संघटनेचे म्हणणे आहे. दोन मागण्या मान्य करून इतर मागण्यांवर चर्चा करण्याची संघटनेची तयारी आहे आंदोलन काळात इतर सर्व कामांवर बहिष्कार टाकला जाईल असे संघटनेने म्हंटले आहे. पदनाम बदलले जात नसल्यामुळे सध्या सर्व कृषी सहायक अस्वस्थ आहेत. गावपातळीवर शेतकऱ्यांसाठी कृषी सहायक सर्वांत जास्त काम करतात. कोतवालाचे पदनाम बदलून महसूल सेवक केले गेले. ग्रामसेवकाला ग्रामपंचायत अधिकारी तर तलाठ्याला ग्राम महसूल अधिकारी असे पदनाम दिले गेले. परंतु, कृषी सहायकांचे नाव बदलले नाही त्यांना केवळ आश्वासने दिली जात आहेत. तालुका पातळीवर देखील कृषी सहायकांना तुच्छ वागणूक मिळते. त्यामुळे कृषी सहायकांनी हे आंदोलन पुकारले आहे. तसेच कृषी खाते डिजिटल होत असताना कृषी सहायकांना लॅपटॉप देखील दिला जात नाही. त्याचा परिणाम सेवांवर होतो. या सर्व समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी कृषी सहायकांनी आता काम बंद आंदोलन छेडले आहे.


# तुळजाभवानी मंदिरातील मूर्ती तोडफोड प्रकरणी महाविकास आघाडी आक्रमक

आरंभ मराठी/ तुळजापूर



श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात सुरु असलेल्या विकासकामांदरम्यान झालेल्या ऐतिहासिक मूर्तींच्या तोडफोडीबाबत महाविकास आघाडी व घटक पक्षांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, जबाबदार असलेल्या व्यक्तीवर कठोर कारवाईची मागणी निवेदनाद्वारे केली आहे. महाविकास आघाडीच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्य शासनाच्या मंजूरीने तुळजाभवानी मंदिर विकास आराखड्यातून सुरू असलेल्या कामांमध्ये मंदिर परिसरातील ऐतिहासिक मूर्तीची तोडफोड करण्यात आली आहे. या प्रकारामुळे हिंदू समाजाच्या भावना दुखावल्या असून, हा प्रकार नियोजित आणि दुर्लक्षपूर्वक करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकाराला जबाबदार असलेल्या राज्य पुरातत्व विभाग, मंदिर संस्थान, संबंधित ठेकेदार व जे दोषी असतील त्यांच्यावर तत्काळ गुन्हा दाखल करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. जर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला आहे. या निवेदनावर महाविकास आघाडीचे धीरज पाटील, ऋषिकेश मगर, श्याम पवार, अमोल कुतवळ, सुधीर कदम, दीपक लोंढे, अमर चोपदार, उदय श्यामराज, कुलदीप लोंढे, राहुल खपले, बालाजी तट, अनमोल साळुंखे, नागनाथ भांजी यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी आहेत.

# मित्रांनो, बापाचं अदृष्य प्रेम ओळखा..



**बाबा**, पिताजी, दादा, आण्णा, आप्पा व आत्ताचे पप्पा, डॅडी असे अनेकांच्या घरात या बापाचे असंख्य नावे. कोणाचे वडील अतिशय संवेदशिल तर कोणाचे अंत्यत शिस्तबध्द तापड, चिडचिड करणारे अशी ओळख असणाऱ्या प्रत्येकाच्या घरात बाप नावाचं अस्तत्वि असतंच अथवा येवून गेलेलं असतं. घरावरच्या पत्र्याची आणी वडीलांची एकच दशा असते. पत्रे ऊन, वारा, पाऊस यापासून संरक्षण करतात आणी जिझून जातात. असंच प्रत्येकाच्या बापाचं अस्तत्वि असतं. मुलगा व्हावा आणी आपला वंश वाढावा, हे प्रत्येक घराचे स्वप्न असते. मुलगा झाला तेंव्हा आई लहानाचे मोठे करते खरे, परंतू त्याला समाजात वावरणे, व्यवहार हा त्याचा बापच शिकवतो. कोणाचे वडील व्यसनी असतात तर कोणाचे प्रापंचकि परंतू प्रत्येक बापाला आपली मुले प्रियच असतात. परिस्थितिनुसार एका टप्प्यावर सर्व व्यसने सोडून ते बेभान होवून केवळ आपल्या मुलांचा विचार करतात. आजची पढि कोणत्याही परस्थितीत आपली व्यसने सोडू शकणार नाही, ही परस्थिती. वडील व्यसनी आहेत आणी मुलाने त्यांना वेगळी वागणूक द्यावी, येवढे तरी आजचे वडील वाया गेलेले असतील असं नाही. आज वडील व्यसन करतही असतील परंतू घरातील कुटूंब प्रमुख म्हणून कळत्या मुलांची ओळख असते तर मुलाने काहीही केलेलं जमतं. परंतू वडलिांची एकही चुक पदरात घेतली जात नाही. बाप हा थकून भागून घरी आल्यावर एक प्याला घेवून आला तर सध्याच्या परस्थितीत स्वंयघोषीत कुटूंब प्रमुख म्हणजेच मुलगा दोन प्याले घेवून आलेला असतो व वडलिांना मारहाण करतो. का तर त्याने दारु घेतली, हे किती संयुक्तीक आहे. आजच्या तरुणांना वडील गेल्या नंतरच कळेल हे निश्चीत. कोणाचे वडील अधिकारी, शिक्षक, व्यावसायिक,शेतकरी तर मजूर असतात. ते आपल्या मुलांसाठी अतिशय प्रतिकूल परस्थितीचा सामना करत आपल्या मुलांना समाजात वावरण्या योग्य बनवतात. कोणाच्या वडीलांनी गडगंज संपत्ती आपल्या मुलांसाठी कमावलेली असते तर कोणाच्या वडीलांनी जेमतेम आपले कुटूंब सुखी समाधानी रहावे याबाबत विचार करुन मुलांना योग्य दिशा दाखवलेली असते. याच वडलिांनी एका टप्प्यावर आपण आता नोकरीतून अथवा आपल्या कर्तव्यातून मुक्त होत आहोत, असे समजून आपल्या कर्तबगार असलेल्या मुलाकडे सगळ्या प्रपंचाच्या चाव्या सुपूर्त केलेल्या असतात. या चाव्याचा गैरफायदा घेवून अनेक कुटूंबात आज या कष्टकरी बापाची किमंत शून्य असल्याचे चित्र सध्या पहायला मिळत आहे. एकेकाळी कुटूंबात या बापाचा पाय घरात येताच शातंता पसरायची याच बापाला आज मुलाला हिशोब द्यावा लागतोय अशी भीषण परस्थिती निर्माण झाली आहे. हीच अनेक मुले आज वडिलांचा कॉल आला तर ते उचलून मी इथे आहे हे सांगायची तसदी देखील घेत नाहीत. कारण त्यांना माहित नाही की वडील गेल्यानंतर हा कॉल त्यांना कधीच येणार नाही. त्यामुळे आजच्या पढिीने आपल्या वयोवृध्द असलेल्या आई-वडलिांची काळजी घेणे त्यांच्याशी दिवसातून किमान १० मिनटि छान हसून बोलणे, त्याची विचारपूस करणे हे अत्यंत गरजेचे आहे. आजच्या पढिीने जिवंत आई-वडलिांची काळजी घ्यावी. कारण ते गेल्यानंतर तुम्ही त्यांच्या कोणत्याही विधीसाठी कितीही जेवणावळी घातल्या तर त्याचा काही उपयोग होणार नाही. जिवंत असलेल्या असलेल्या बापाला ओळखा त्यांची काळजी घ्या एवढंच. तुम्ही माझ्यासाठी काय केलंय, असं वडलिांना विचारणाऱ्या तरुणांनो जरा विचार करा..ही बुध्दी, समाज, व्यवहार हे सर्व विश्व दाखवणारे तुमचे वडीलचआहेत.माझे वडील स्व.दत्तुसिंह महावीरसिंह चंदेल म्हणजे आमच्या घराचं वैभव, जे कोरानानं आमच्यातून २०२१ मध्ये हिरावून घेतलं.आज मी त्यांच्या कार्याची आणि शिकवणीची आठवण करत कुटुंबाचा गाढा हाकत आहे. त्यांच्या जाण्याने घरात पोकळी निर्माण झाली आहे, जी कधीच भरुन निघणार नाही. त्यांची सामाजकि बांधलिकी आणी व्यवहार हाच माझ्यासाठी अमुल्य ठेवा आहे. कोरोना काळात रुग्णालयात तब्बल १ महिना त्यांची २४ तास सेवा केली. मी उभ्या आयुष्यात वडलिांच्या डोळ्यात डोळे घालून पहायचं धाडस कधीच केलं नाही. परंतू ते आजारी असताना मात्र त्यांच्याजवळ जायची संधी मला मिळाली. त्यांच्या पायाच्या भेगा व त्यांची जिर्ण झालेली त्वचा आजही डोळ्याआड जात नाही. त्यांची आठवण हृदयात साठवून जीवनाची वाटचाल करतोय. त्यांना विनम्र अभिवादन.



-अमोलसिंह दत्तूसिंह चंदेल,आरंभ मराठी, शिराढोण.

# उतू नका,मातू नका,माणुसकी सोडू नका..



**फेसबुकवर** दोन व्हिडिओ पाहण्यात आले. दोन्ही व्हिडिओ हृदयाला भिडणारे होते. पहिला व्हिडिओ होता नारळपाणी विकणाऱ्या बापाचा आणि कॉलेजमध्ये शिक्षण शिकणाऱ्या मुलाचा. तो आपल्या वडिलांना नवीन कपडे घेण्यासाठी पैसे मागतो. वडील चारशे रुपये देतात. मुलगा चिडतो आणि वडिलांना चार शब्द सुनावतो. वडील सांगतात की, सकाळपासून नारळपाणी विकले गेले नाही.माझ्याकडे जेवढे पैसे होते तेवढे मी तुला दिले.तेव्हा मुलगा वडिलांना घरी जेवायला पाठवतो आणि स्वत: नारळपाणी विकायला बसतो. आणि मग वेगवेगळ्या नमुन्यांच्या ग्राहकांना तोंड कसे द्यावे लागते, ग्राहक किती घासाघीस करतात, भाव कमी नाही केला तर नारळपाणी विकत घेत नाहीत. हे मुलाच्या लक्षात येते. घर, प्रपंच चालविण्यासाठी वडिलांना किती कष्ट सोसावे लागतात याची त्याला जाणीव होते आणि घरी गेलेले वडील आल्यावर तो त्यांची क्षमा मागतो.

दुसरा व्हिडिओ शिक्षणानंतर ताटातूट झालेल्या दोन मित्रांचा होता. सिनेमात दाखवतात त्याप्रमाणे एक गरीब मित्र बऱ्याच दिवसांनी श्रीमंत मित्राला भेटायला येतो. श्रीमंत मित्र त्याची गळाभेट घेऊन आनंदी होतो. त्याच्याशी खूप बोलतो,कॉलेज जीवनातील दिवस किती मजेत होते हे ही सांगतो. चहापानानंतर गरीब मित्र निरोप घेऊन निघतो,तेवढ्यात श्रीमंत मित्र गरीब मित्राच्या हातात वीस हजार रुपये देऊन ते खिशात ठेवायला सांगतो.गरीब मित्र नको नको म्हणतो.तेव्हा तो श्रीमंत मित्र म्हणतो,'कॉलेज जीवनात तू मला खूप मदत केली होतीस,याची जाणीव आहे मला'.मग दोघेही एकमेकांची गळाभेट घेतात. हे सगळं श्रीमंत मित्राची पत्नी लांबून पहात असते. त्यांचे मित्र प्रेम पाहून ती ही आनंदी होते. आजकाल असे भावनिक आणि माणुसकी पेरणारे व्हिडिओ क्वचित पाहायला मिळतात. कारण या दोन व्हिडिओंच्या विपरीत परिस्थिती सम ाजात व आपल्या अवतीभवती पाहायला मिळते.वृध्द आईवडील दिवसभर शेतात कष्ट करतात,घाम गाळतात आणि त्यांचा तरूण मुलगा वाईट मित्रांसोबत गावात टवाळक्या करत हिंडतो,व्यसने करतो. वृध्द आईवडिलांना सांभाळायची गरज असताना वृध्द आईवडील त्याला पोसतात.दुसऱ्या एका घरचे सख्खे भाऊ वडिलोपार्जित शेतीच्या वाटणीसाठी कोर्टात गेले आहेत. वकीलांचे खिसे भरून कोर्टाच्या तारखा करत आहेत.शेतीचा वाद आपापसांत मिटवता आला असता परंतु संपत्तीचा हव्यास माणसाला राक्षस बनवतो आणि म्हणून माणसं रक्ताची नाते तोडतात मस्ती आल्यासारखे जीवन जगतात. माणुसकी विकायला काढतात. आजकाल समाजात,आपल्या अवतीभवती अनेक वाईट घटना घडत आहेत.लोक मस्तवालपणे मनमानी जीवन जगत आहेत.या मस्तीत माणुसकीचा त्याग करून राक्षसी प्रवृत्तीचा अंगिकार करत आहेत.आपले कर्तव्य,आपले कर्म प्रामाणिकपणे पार न पाडता काम चुकारपणा करून,मनमानी जीवन जगून दुसऱ्यांना संकटात ढकलत आहेत.पैशाच्या मोहापायी दुष्कृत्ये करुन माणुसकी वेशीवर टांगत आहेत.सगळं काही फुकटात मिळावे यासाठी मरमर करत आहेत. गावातील व शहरातील प्रत्येक गल्लीत गुंड लोकांची व वाईट कृत्ये करणाऱ्यांची संख्या वाढली आहे.हे पाहून चांगले व सज्जन लोक जीव मुठीत धरून जीवन जगत आहेत.त्यांना विनाकारण वाईट व गुंड लोकांचा त्रास सहन करावा लागतो आहे.वाईटांचा सुकाळ आणि सज्जनांचा दुष्काळ ही परिस्थिती मानवजातीला कुठे घेऊन जाणार आहे कळायला मार्ग नाही. जीवाची व रक्ताची नाते तोडून स्वार्थी व बिनकामाची नाते जोडले जात आहेत. चांगले वागणे,चांगले बोलणे आणि चांगले जीवन जगायचे असते हे लोक विसरले आहेत. त्यामुळे मानवी जीवनात अशांतता निर्माण झाली आहे,माणसं सुख हरवून बसले आहेत.म्हणून माणूस या नात्याने सांगावे वाटते की उतू नका,मातू नका,माणुसकीला सोडू नका.

बबन दामोदर गुळवे
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर.मो.९५४५४४२६४८.

# गुणांच्या पलीकडचं यश

**इयत्ता** दहावीच्या बोर्ड परीक्षेचा निकाल लागला. यामध्ये २११ विद्यार्थ्यांना शंभर टक्के गुण मि ळाले. ९०% पेक्षा जास्त गुण मि ळवणारे विद्यार्थी ८१ हजारांपेक्षा जास्त आहेत. ८५% पेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १ लाख ११ हजारांच्या घरात आहे. ८० ते ८५% गुण मिळवणाऱ्यांची संख्या १ लाख ४० हजारांपर्यंत आहे. ७५ ते ८०% गुण मिळवणाऱ्यांची संख्या १ लाख ५६ हजारांपर्यंत आहे. दहावीच्या गुणांची टक्केवारी 'बेस्ट फाईव्ह' म्हणजेच सर्वाधिक गुण मिळालेल्या सहा विषयांपैकी पाच विषयांवरून काढली जाते, हे देखील येथे नमूद करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर, प्रत्येक विषयातील शंभर गुणांच्या परीक्षेमध्ये २० गुण हे तोंडी परीक्षेसाठी आहेत. हे गुण शाळा पातळीवर दिले जात असल्यामुळे बहुतांश वेळा बऱ्याच विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण दिले जातात. यासोबतच कला, क्रीडा, एनसीसी, स्काउट-गाइड यासाठी अतिरिक्त गुणही दिले जातात. अशाप्रकारे गुणांची खिरापत वाटल्यामुळे जो निकाल दिसतो, तो ' गुणवत्ता आहे की फुगवटा? ' असा प्रश्न सर्वसाम ान्यांच्या मनात निर्माण होतो.पूर्वी दहावी पास होणे म्हणजे फार म ोठे दिव्य पार करणे अशी स्थिती होती. त्या काळात बरेच विद्यार्थी गणित आणि इंग्रजी या विषयात नापास व्हायचे. पुढे ऑक्टोबर आणि मार्च अशा दोन प्रयत्नांतून मुले ते विषय काढायचे.काही मुलांचे एक-दोन तर काहींचे तब्बल तीन-चार वर्षे दहावी पास होण्यासाठी जात असत. यामुळे अशा मुलांचा शिक्षणातला रस कमी होऊन ते शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर पडायचे;आणि अकुशल कामगार म्हणून काम ाला लागायचे. यामुळे त्यांच्या जीवनात फार मोठी ससेहोलपट होत असे.दहावी नापास होणाऱ्यांच्या कपाळावर फार म ोठा कलंक लागलेला असायचा. तो पुसता-पुसता त्यांचे अर्धे आयुष्य निघून जायचे.आता मात्र परिस्थिती पूर्णत: बदलली आहे. दहावी पास होणे खूपच सोपे झाले आहे. विद्यार्थी नाउमेद होऊ नये, शिक्षणातील प्रत्येक टप्प्यावर त्याला संधी मिळत जावी, व्यक्तिमत्त्व विकासाची प्रक्रिया कुठेही खंडित होऊ नये, यासाठी परीक्षा सुलभ झाल्या आहेत.परंतु गुणांचा फुगवटा झाल्यामुळे, विद्यार्थी आणि पालकांना पुढील शिक्षणाबाबत




निर्णय घेताना अचूक अंदाज बांधणे अवघड झाले आहे. पूर्वी गणित आणि विज्ञान या विषयात ८० पेक्षा जास्त गुण असले की विद्यार्थी विज्ञान शाखेकडे जायचे. आता मात्र हा निकष ९० गुणांवर गेला आहे.ज्या २११ विद्यार्थ्यांना १००% गुण मिळाले आहेत, त्यांची पुढील शैक्षणिक कारकीर्द कितपत यशस्वी होते ; आणि ते कोणत्या व्यावसायिक शिक्षणासाठी पात्र ठरतात, याची पडताळणी पुढे केली गेली पाहिजे. खरंतर, ९०% व त्याहून अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांनी संशोधन क्षेत्रात आघाडी घेतली पाहिजे. विज्ञान, तंत्रज्ञान, सामाजिक, राजकीय अथवा आर्थिक संस्थांचे आणि उद्योग व्यवसायांचे नेतृत्व या शिक्षणातील 'क्रीम लेयर'ने करायला हवे. परंतु तसे होताना दिसत नाही.दहावीत ८० ते ९०% गुण मिळवणारे अनेक विद्यार्थी बारावी विज्ञान शाखेत गेल्यावर ६०% पेक्षाही कमी गुणांवर येतात. त्यामुळे दहावीच्या विषयातील गुणांवरून विद्यार्थ्यांची गुणवत्ता आणि कल ओळखणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, ज्या विद्यार्थ्यांना सामाजिक शास्त्रांमध्ये चांगले गुण असतील, तर त्या विद्यार्थ्यांना कला शाखेत पाठवून इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, मानसशास्त्र यासारखे विषय शिकायला द्यावेत. भूगर्भशास्त्र, पर्यावरण, तत्त्वज्ञान, नीतीशास्त्र, विविध कला (चित्रकला, शिल्पकला, वास्तुकला, संगीत, नृत्य, नाट्य, चित्रपट), साहित्य, भाषाशास्त्र, विधी यासारख्या मानव्य विद्या व सामाजिक विज्ञान शाखांमध्ये करिअरच्या संधी त्यांना शोधता येईल.गणित आणि विज्ञान विषयात ८५-९० च्या वर गुण असलेल्या विद्यार्थ्यांना विज्ञान शाखेकडे पाठवले पाहिजे. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, खगोलशास्त्र, अभियांत्रिकी, संगणक विज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रात त्यांना करियर बनवता येईल. अंकगणित आणि व्यवहारज्ञान असलेल्या विद्यार्थ्यांना वाणिज्य शाखेकडे वळवले पाहिजे. हे जरी आपण साधारणपणे सांगत असलो, तरी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार पुढील काळात कला, विज्ञान आणि वाणिज्य या शाखांमधील भिंती कोसळणार आहेत. त्यामुळे हा काळ शैक्षणिक क्षेत्रात मोठा कायापालट घडवणारा ठरणार आहे. म्हणूनच, इयत्ता दहावीच्या गुणांवरून विद्यार्थ्यांची गुणवत्ता ठरवणे योग्य नाही. कोणी ५०% गुण मिळवून प्रगतिशील बागायतदार होतो, तर ६०% गुण मिळवलेला विद्यार्थी प्रशासकीय सेवेत उच्चपदस्थ अधिकारी होतो. ७०% गुण मिळवणारे उद्योग व्यवसायात यशस्वी होतात, तर काही शिक्षक, प्राध्यापक, पत्रकार, समाजसेवक म्हणून आपला ठसा उमटवतात.मागील बाकावर बसणारे काहीजण सगळ्यांना ओव्हरटेक करून पुढे गेलेले दिसतात. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी कमी गुण मिळवलेत अथवा जे नापास झाले आहेत त्यांनी नाउमेद न होता शिक्षणप्रक्रियेत आपले स्थान शोधावे आणि योग्य ते क्षेत्र आपल्या व्यक्तीमत्वास अनुसरून निवडावे...



किशोर जाधव,सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

# गाल होता गुलाबी, उमले प्रेमाची भावना, हर रंग अंगी चढता, होई भावनांशी सामना

आरंभ मराठीच्या रसिक वाचकांना सादर नमस्कार.
आज काव्यारंभचे पंधरावे पुष्प मी उदगीर येथील प्रसिद्ध साहित्यिका सौ.अश्विनी महेश निवर्गी यांच्या कवितांनी गुंफणार आहे.
अश्विनीताई एम. फिल.( मेडिकल मायक्रोबायलॉजी ) डी.एम. एल. टी.,एम. एड.,नेट.
झालेल्या आहेत. विविध शाळा महाविद्यालयांमध्ये अध्यापन व प्रशासनाचा त्यांना अनुभव आहे. अनेक महाविदयालयांमध्ये त्यांनी नेट सेट वर्गांना मार्गदर्शन पर व्याख्याने दिली आहेत.
साहित्यिक सखी समूह, उदगीरच्या त्या संचालिका आहेत,आंम्ही सिद्ध लेखिका या
राष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या महिला साहित्यिकांच्या संस्थेच्या त्या राष्ट्रीय कार्यकारिणी सभासद आहेत व मराठवाडा विभाग प्रमुख व लातुर जिल्हा अध्यक्ष आहेत. संस्कार भारती, उदगीर शाखेच्या त्या साहित्य विधा प्रमुख आहेत.
जिव्हाळा ग्रुप उदगीर तर्फे त्यांना कोरोना काळात महिलांना लिहिते केल्याबद्दल कोरोना योद्धा हा पुरस्कार, साहित्य दीप प्रतिष्ठान पुणे यांचा कथादीप २०२५ हा पुरस्कार, पारिजात साहित्य समूहातर्फे साहित्यरत्न पुरस्कार त्यांना मिळालेला आहे.
अश्विनी निवर्गी यांची आत्तापर्यंत ५० पुस्तकं प्रकाशित झालेली आहेत त्यात कोष, काव्यकस्तुरी, अष्टगंधा हे कवितासंग्रह तर अर्थ, कथारंग, ती, वसा, प्रशालिका, विनोदवारी, हरवलेली कडी हे कथासंग्रह आहेत. शब्दातीत हा अलक संग्रह आहे. गोडुल्यांची नाटुकली, अस्वस्थ स्पंदने हे बालसाहित्य आहे, इतर त्यांची ५० च्या वर संपादित पुस्तकं आहे,
स्वत:बरोबरच इतर अनेक महिलांना त्यांनी लेखनासाठी प्रोत्साहित करून त्यांची पुस्तके प्रकाशित केली आहेत.
तर अशा या उत्तम व्याख्यात्या, सूत्रसंचालक, कवयित्री, गीतकार, कथालेखिका, तंत्रस्नेही, असे अष्टपैलु व्यक्तिमत्व असलेल्या अश्विनी निवर्गी यांच्या आशयघन कवितांचा आपण रसास्वाद घेऊ या.
आता कवयित्रीची तो आणि ती ही कविता बघितली तर त्यात परस्पर भिन्न व्यक्तिमत्व असलेले पतीपत्नी दीर्घ काळाच्या सहवासाने कसे एकरूप होतात याचे गुपीत सांगितले आहे, त्या म्हणतात,
मुरड घालतात मनाला
जगणे एकमेकां सारखे
काळजी घेतात याचीच
होऊ नये प्रेमाला पारखे !
तर रंग लेखणीचे या कवितेत
आपल्या लेखणीतून काय काय होणे अपेक्षित आहे, हे मांडले आहे. लेखणीने मनोरंजन तर करावेच पण अन्यायाविरुद्धसुद्धा लढावे, दीनदुबळ्यांच्या दुःखाला वाचा फोडावी, ही अपेक्षा व्यक्त केली आहे. शेवटी त्या म्हणतात,
माध्यम हवे अव्यक्त भावनांना
शब्दांना प्रकट 'करावे लेखणीने
दंड थोपटून उभे रहावे
जणू लेखणी अन कागदाने !
कविता मनातल्या भावना कमी शब्दांत प्रभावीपणे मांडू शकते.
कोलाहल मनीचा या कवितेत कवयित्रीने शहीद झालेल्या जवानाच्या वीरपत्नीच्या भावना शब्दबद्ध केल्या आहेत. तर पारिजात या कवितेत प्राजक्ताच्या फुलाला तपस्वी साधनेत मग्न असलेले फूल अशी अतिशय समर्पक उपमा दिली आहे,
ती म्हणते,परमार्थ प्रपंचातदोन्ही कसे जमवावेनीरक्षीर विवेकानेप्राजक्ताने शिकवावे!किती सुंदर कवीकल्पना! अवघा रंग एक झाला या कवितेत कवयत्री सर्व रंगांचे महत्व सांगते आणि शेवटी सर्व रंगात रंगून अवघा रंग एक होऊन जीवाशिवाचे मीलन घडले व आकाश निळाई ल्याले असे अध्यात्मिक वळण कवितेला देते.तर शा या वेगवेगळ्या वषयांवरच्या सुंदर कवितांचा आपणआस्वाद घेऊया.



काव्यारंभ
डॉ रेखा अनिल ढगे

## तो आणि ती

त्याला आवडतो लेख
तिला आवडते कविता
तो रूक्ष जगात रमणारा
ती आहे अखंड प्रवाहिता

तो समाज, राजकारण
ती मात्र अगदी स्वप्नाळू
तो सडेतोड स्पष्टवक्ता
ती भिडस्त जणू लाजाळू

कसं जमतं या दोघांचं ?
अनेकांना प्रश्न पडलेला
इतक्या वर्षांचा सहवास
नाही कधीच तुटलेला

गुपित त्याचं असं आहे
आपण ते जाणून घेऊ
दीर्घ वयातले पती-पत्नी
जणू जुळे बहीण भाऊ

मुरड घालतात मनाला
जगणे एकमेकांसारखे
काळजी घेतात याचीच
होऊ नये प्रेमाला पारखे

लेखातला रोखठोकपणा
नाजूक कवितेत मिसळतो
दोघांच्या ओठांचा प्याला
मृदू आयुष्यात विरघळतो

मग त्याची होते कविता
ती होते थोडी काटेकोर
त्याकडे बघत, हळूच हसत
ती रेखिते भाळी चंद्रकोर

## अवघा रंग एक झाला

मुक्त खगा परी विहरावे
स्वच्छंदी रुप घ्यावे
हिरवा रंग समृद्धीचा
धरतीवर फुलून यावे
ज्वालांचा लाल रंग
मन कातर कातर भारी
पिवळा रंग आशावादी
देई मनाला उभारी

जांभळा रंग गुढ रम्य
निळा रंग दावी विश्वास
येई अध्यात्माची छटा
सांगे मोज उरलेले श्वास

गाल होता गुलाबी
उमले प्रेमाची भावना
हर रंग अंगी चढता
होई भावनांशी सामना

रंगात रंगुनी साऱ्या
अवघा रंग एक झाला
जिवाशिवाचे मिलन घडले
आकाश रंग निळाई ल्याला.

## रंग लेखणीचे

गावती मज रंग लेखणीचे
त्रालांचा रंग तिला चढावा
ध्धी प्रेमात रंगून जाऊन
खणीला गुलाबी रंग यावा

यायाविरुद्ध चालावी लेखणी
व्रणीने माझ्या प्रक्षोभक व्हावे
ोढावा आसूड, मारावे फटके
से सामर्थ्य लेखणीस यावे

गावे दीनांचे दुःख तिने
ांडावे हळूवार कष्ट वेदनेचे
रझर पाझरावे,उमटावे साहित्य
याने लेवून कोंदण कल्पनेचे
ी मनोरंजनाचा रंग यावा

खळखळून रसिकांना हसवावे
कधी चिमटे, कधी गुदगुल्या
हसता हसता अश्रू पुसावे
माध्यम हवे अव्यक्त भावनांना
शब्दांना प्रकट करावे लेखणीने
दंड थोपटून उभे रहावे
जणू लेखणीअन्कागदाने.

## कोलाहल मनीचा

तना मनात गहिवर तो आठवांचा
मला त्रास होतो तुझ्या नसण्याचा
शव पाहून तिरंग्यातील शहीदाचा
फुटे उरी माझ्या महापूर
भावनांचा....१

काय सांगू रे चिवचिवत्या
पाखरांना ?
कशी घालू सांग बांध आसवांना ?
कसा लढा भाळावरील प्राक्तनाचा
काय बोलू अशा नीच म
ाणसांना ?....२

पत्ता लागता हरवल्या
सौभाग्याचा..
रोज लढा माझा, त्यांच्या नजरांचा
आधार थकल्या माता पित्याचा
सवे त्यांच्या जाई पथ
जीवनाचा....३

सुके मोगरा भिंतीवर प्रतिमेचा
मनी ताजा, तुझ्या माझ्या बहराचा
तुझा वारसा देशभक्त सैनिकाचा
पिल्लू आक्रमेल मार्ग वडिलांचा...४

जळते आत विरहिणी अशी मी
वावरेन जगी वीरपत्नी म्हणुनी
हृदयी आठवण मिटल्या स्वप्नांची
कापेन खडतर मार्ग तुज स्म
रूनी...५

## पारिजाताची शिकवण

मज वाटे तपस्वीचे
साधनेत मग्न जसे
समाधानी परि भासे
पारिजात फूल असे
उमलते शुभ्र कळी
विरक्तीत समाधान
शुभ्र तनु नाजुकशी
कानी सांगे ब्रह्मज्ञान

दांडा त्याचा केशराचा
स्वाद घ्यावा रसपाना
रंग भासे जीवनाचा
आयुष्याला वेचताना

अल्पजीवी पारिजात
परि गंध आसमंती
करी धरा सुगंधित
शिकु तयाची भ्रमंती

फुल बहु श्वेतवर्णी
ईश्वराच्या पायी लीन
कधी धुळीत माखावे
आगंतुका पायी दीन

परमार्थ प्रपंचात
दोन्ही कसे जमवावे
नीरक्षीरविवेकाने
प्राजक्ताने शिकवावे
सुगंधित करी तनु
ओंजळीत फुले घेता
जीवा शिवाच्या मीलनी
जावे चाहूल न देता



सौ. अश्विनी निवर्गी,
उदगीर,
जिल्हा लातूर

# वाशी येथे छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर, वारकरी दिंडी



आरंभ मराठी/ वाशी

वाशी शहरातील छत्रपती संभाजीराजे प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त बुधवारी (दि.१४) रक्तदान शिबिर व वारकरी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील बेलेश्वर मित्रमंडळ, शिवछत्रपती प्रतिष्ठान यांच्या वतीनेही छत्रपती संभाजीराजे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शहरातील धर्मवीर संभाजी राजे चौकात संभाजीराजे प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याचे मंडळ सदस्यांच्या हस्ते पूजन करून आरती करण्यात आली. त्यानंतर शहरातून बाल वारकरी दिंडी काढण्यात आली. शहरातील चौकाचौकात दिंडीमधील बाल वारकऱ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे प्रदर्शन केले. तसेच जयंतीनिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात २१ रक्तदात्यानी रक्तदान केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नगरसेवक राजुभैय्या कवडे, सूरज मोळवणे, मनोज कवडे, संजय कवडे, गजानन भारती, बाळासाहेब कवडे, तुषार कवडे, आबा उंद्रे, आकाश भोसले, गणेश उंद्रे यांच्यासह संभाजीराजे प्रतिष्ठानच्या सर्व पदाधिकारी यांनी प्रयत्न केले.

# कुलस्वामी जोतिबाच्या दर्शनाला मराठवाड्यातील भाविक सर्वाधिक, अंबाबाईच्या दर्शनासाठी आंध्रप्रदेशातील भाविकांचे प्रमाण वाढले

## कोल्हापुरात देवीदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांचे प्रमाण वर्षाला ५० लाखांवर

बाबासाहेब खाडे / आरंभ मराठी

कोल्हापूर : कुलस्वामी म्हणून दक्षिण महाराष्ट्र, मराठवाड्यातील मराठमोळे कुटुंब वर्षातून किमान एक-दोन वेळा जोतिबाच्या दर्शनासाठी येतात, अशी माहिती समोर येत आहे. करवीर निवासिनी श्री अंबाबाईच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांमध्ये सर्वाधिक संख्या आंध्र प्रदेशमधील आहे. मुंबई-पुण्यासह विविध ठिकाणांहून गोवा, कोकण, बंगळूरला पर्यटनासाठी जाता जाता कोल्हापुरात येऊन अंबाबाईचे दर्शन घेणाऱ्यांची संख्या ४० टक्के आहे.श्री अंबाबाईला येणाऱ्या भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, वर्षाला साधारण ५० लाखांवर भाविक मंदिराला भेट देतात. भारतातील ५१ शक्तिपीठे आणि महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठात अंबाबाई असल्याने देशभरातील भाविक देवीच्या चरणी लीन होतात. पण देवस्थान समितीच्या निरीक्षणानुसार यामध्ये सर्वाधिक संख्या ही आंध्र, तमिळनाडू, हैदराबाद, बंगळूर येथील भाविकांची आहे. कारण येथील कुटुंबे देवीला कुलस्वामिनी मानतात. तुळजाभवानीप्रमाणे काही कुटुंबे अंबाबाईचादेखील गोंधळ घालतात. अशा विविध कारणांमुळे अंबाबाईला उच्चभ्रू ते अठरापगड जातीतील भाविकांची मांदियाळी असते.



### सुट्टीत रोज ५० हजारांवर भाविक

उन्हाळ्यात शुक्रवार, शनिवार, रविवार या सुट्ट्यांच्या दिवशी अंबाबाईला येणाऱ्या भाविकांची संख्या रोज ५० ते ७० हजारांपर्यंत आहे. इतर दिवशी ही संख्या २० हजारांपर्यंत असते. नवरात्रोत्सवात दिवसाला १ ते २ लाख भाविकांची नोंद होते.

- आंध्र, कर्नाटकमधील भाविक संख्या : ३० टक्के
- कुलस्वामिनी अंबाबाई, जोतिबा म्हणून दर्शनासाठी येणाऱ्यांची संख्या : ३०
- गोवा, कोकणसह विविध ठिकाणी जाणारे पर्यटक : ४० टक्के

### कुलस्वामीचे जोडीने दर्शन

एप्रिल-मेमध्ये विवाह मुहूर्त असल्याने सध्या पर्यटकांबरोबरच नवविवाहित जोडपी मंदिर आवारात दिसत आहेत. महाराष्ट्रातील बहुजन कुटुंबांचा कुलस्वामी जोतिबा आहे. जोतिबा मंदिरावर काही कुटुंबांकडून गोंधळही घातला जातो. जोतिबाचे दर्शन झाले की भाविक अंबाबाईला येतात. जेजुरीचा खंडोबा आणि तुळजापूरची तुळजाभवानी या देवतांना सर्वाधिक भाविक असतात. प्रत्येकाच्या घरी आता चार चाकीची सुविधा असल्याने तीन-चार दिवसांच्या सुटीचे नियोजन करून कित्येक कुटुंबे दर्शनासह पर्यटनाचे नियोजन करतात.

### आंध्रची संख्या जास्त का ?

तिरुपती बालाजीचे दर्शन घेतल्यावर आदिमाता असलेल्या अंबाबाईचे दर्शन घेण्याची पद्धत आहे. आंध्रचे भाविक देवीच्या लक्ष्मी या स्वरूपाला मानतात. तसेच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून बालाजीला गेलेले भाविक अंबाबाई दर्शनाला येतात. हरिप्रिया एक्स्प्रेसमुळे थेट कोल्हापूरला येता येते.

## अक्षदा आणि अनुष वाघमारे यांचा सत्कार




आरंभ मराठी / धाराशिव

श्री साई श्रद्धा एज्युकेशन संस्थेचे संचालक प्रा.सोमनाथ लांडगे यांच्या हस्ते अक्षदा नामदेव वाघमारे (९३.६०%) व अनुष गणेश वाघमारे (८३.४०%) या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या यशस्वी विद्यार्थ्यांनीउत्तम गुण मिळवून आपल्या कुटुंबाचे, शिक्षकांचे व समाजाचे नाव उज्वल केले आहे. श्री साई श्रद्धा एज्युकेशन परिवाराच्या वतीने या दोघा विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी प्रा.सोमनाथ लांडगे व संचालिका उषाताई लांडगे यांनी दोघांचा सत्कार केला.

## रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी

आरंभ मराठी / धाराशिव



धाराशिव येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ.जयसिंगराव देशमुख म्हणाले की, छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे १६५७ रोजी किल्ले पुरंदर येथे झाला. राजपुत्र असल्यामुळे रणांगणावरील मोहिमा आणि राजकारणातील डावपेच यांचे बाळकडू त्यांना लहानपणापासूनच मिळालेले होते. त्यामुळे त्यांनी शत्रूवर सहजासहजी मात केली. बलदंड शरिरयष्टीचे छत्रपती संभाजी महाराज हे चारित्र्यसंपन्न आणि निर्व्यसनी होते. सध्याच्या काळामध्ये तरुण पिढीने छत्रपती संभाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून कोणत्याही क्षेत्रामध्ये कार्य करावे. इतिहासातील अनेक नोंदी पाहिल्यास संभाजी महाराज अत्यंत देखणे आणि शूर होते. तसेच ते अनेक भाषांत विद्या विशारद व अत्यंत धुरंदर राजकारणी होते. असेही ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## संजीवनी मॉडर्न इंग्लिश स्कूलला राज्य शिक्षा पुरस्कार

आरंभ मराठी / उमरगा




उमरगा तालुक्यातील एकोंडी येथील संजीवनी मॉडर्न इंग्लीश स्कूलला राज्य शिक्षा अवॉर्ड पुणे फोर पॉईंट्स शेराटन येथे नुकताच प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सुमित मेहता हे होते तर प्रमुख पाहुणे मिलान शेख हे होते. या वेळी संजीवनी बहुऊदेशीय संस्थेचे अध्यक्ष अनुप चिंचोळी यांचा सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. शालेय यशाच्या प्रगती बद्दल संस्थेचे कार्यवाहक धनराज कांबळे यांनी समाधान व्यक्त केले. या वेळी सुमित मेहता बोलताना म्हणाले की, हा शिक्षा अवॉर्ड हा शिक्षणातील भरीव कामगिरीमुळे दिला जातो. ग्रामीण भागातील व जिल्हातील एकमेव शाळा आहे ज्याला हा पुरस्कार मिळाला आहे. भविष्यात सुद्धा शाळेने असे विविध उपक्रम राबवून परिसरात नावलौकिक करावा असे मत व्यक्त केले. या यशाबद्दल प्राचार्य जीवनमाला आळंगे, नाजमीन सौदागर यांनी आनंद व्यक्त केला.

## शिवाई इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग येथे जागतिक परिचारिका दिन उत्साहात




आरंभ मराठी / उमरगा

उमरगा तालुक्यातील कोरेगाववाडी येथील शिवाई इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग येथे जागतिक परिचारिका दिवस फ्लोरेन्स नायटिंगल यांच्या प्रतिमेचे पूजन करून साजरा करण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष बी.एच. बेडदुर्गे होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव डॉ.विजय बेडदुर्गे संस्थेचे, उपाध्यक्ष प्रा.अजय बेडदुर्गे उपस्थित होते. याप्रसंगी मार्गदर्शन करत असताना डॉ. विजय बेडबुर्गे यांनी परिचारिकांचे रुग्णसेवेतील महत्त्व सांगितले. आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन परिचारिकांच्या योगदानाला गौरवतो. हा दिवस नर्सिंग व्यवसायातील महत्त्वपूर्ण योगदान आणि समाजासाठी परिचारिकांचे महत्त्व अधोरेखित करतो. तसेच परिचारिकांच्या समस्या आणि आव्हानांवर प्रकाश टाकतो आणि त्यांच्या कार्याला प्रोत्साहन देतो. शुभम सूर्यवंशी यांनी परिचारिका दिनाचा इतिहास सांगितला. आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन दरवर्षी १२ मे रोजी साजरा केला जातो. आधुनिक नर्सिंगची सुरुवात करणाऱ्या परिचारिका फ्लोरेन्स नाइटिंगेल यांच्या जन्मदिवसाची आठवण म्हणून साजरा केला जातो. यावेळी प्रशांत वाघमारे यांनी परिचारिका दिनाबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वैद्यकीय जीवनामध्ये प्रवास करत असताना रुग्णसेवेचा परिचारिका हा केंद्रबिंदू आहे. यावेळी परिचारिका दिनाबद्दल संचिता बाबळसुरे , विजयालक्ष्मी माळी, अंकिता शिरसाट या विद्यार्थ्यांनी परिचारिका दिनाबद्दल आपले मनोगत वक्त केले. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक प्रशांत वाघमारे, शुभम सूर्यवंशी, प्रियंका राठोड, अविनाश चौधरी, अभिजीत पाटील, शहाबाज शेख, औदुंबर जाधवर, अविनाश कुंभार, शुभांगी बंदीचोडे, मोनिका धुरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शर्वरी जगताप, कांचन गायके यांनी केले व आभार प्रदर्शन अभिजीत पाटील यांनी केले.

## ८५ टक्केपेक्षा अधिक गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार; संपर्क साधण्याचे आवाहन

आरंभ मराठी / धाराशिव

धाराशिव शहारातील प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत ८५ टक्के पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. त्यामुळे धाराशिव शहरातील ज्या विद्यार्थ्यांना ८५ टक्के पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत त्यांनी दिनांक २५ मे पर्यंत गुणपत्रिकेची प्रत अविनाश मुंडे ए ए डिझाईन्स ( ७३५०९६०६१६) व शंकर बागल त्रिवेणी ज्यूस सेंटर (९४२२४६६६१५) समता कॉलनी धाराशिव येथे कोणत्याही एका ठिकाणी जमा करून नावनोंदणी करावी. असे आवाहन कलाविष्कार अकादमी, अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्था, अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती तर्फे युवराज नळे, शरद वडगावकर, समाधान शिकेतोड, रविंद्र शिंदे, मल्हारी माने, शेषनाथ वाघ, रविंद्र कुलकर्णी, भागवत घेवारे यांनी केले आहे.

## गौरगावच्या वैष्णवी पाटोळे हिचे बारावी परीक्षेत यश

आरंभ मराठी/ शिराढोण



कळंब तालुक्यातील गौरगाव येथील वैष्णवी दादासाहेब पाटोळे हिने दयानंद महाविद्यालय लातूर येथे इयत्ता बारावी मध्ये विज्ञान शाखेत ९२% गुण घेऊन सर्वप्रथम येण्याचा बहूमान मिळविला. ग्रामीण भागातील वैष्णवी हिचे प्राथामिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा गौरगाव येथे तर माध्यमिक शिक्षण येथीलच जय भवानी हायस्कूल येथे मराठी माध्यमातून झाले. तिने अकरावीत दयानंद महाविद्यालय लातूर येथे प्रवेश घेतला. विशेष म्हणजे घरची आर्थिक परिस्थिती खूप हलाखीची असूनही कुठलीही खाजगी शिकवणी न लावता अतिशय जिद्दीने व मेहनतीने अभ्यास करून हे यश संपादन केले. या यशाबद्दल तिचे जि प प्राशा गौरगाव येथील मुख्याध्यापक के. एम.ढोले, शिक्षक गोविंद गोरे व विकास कापसे यांनी अभिनंदन केले.या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## श्रावणी पवार शंभर टक्के गुण घेऊन दहावीत उत्तीर्ण

आरंभ मराठी / धाराशिव



धाराशिव शहरातील श्रीपतराव भोसले हायस्कूलची विद्यार्थिनी श्रावणी जयप्रकाश पवार हिने इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत शंभर टक्के गुण घेऊन घवघवीत यश मिळवले आहे.श्रावणी हिने वर्षभर कठोर मेहनत करत हे यश मिळवले आहे. श्रावणी हिचे वडील जयप्रकाश पांडुरंग पवार आणि आई मंजुषा पांडुरंग काशीद-पवार हे दोघेही पोलीस कर्मचारी आहेत. आई वडिलांना दोघांनाही सतत व्यस्त राहावे लागते. परंतु तरीही श्रावणी हिने अथक परिश्रम घेऊन दहावी बोर्ड परीक्षेत यश मिळवले.पोलीस कन्या म्हणून तिने या निकालातून पालकांचा व शाळेचा लौकिक वाढवला. श्रावणी हिच्या या यशाबद्दल तिच्या कुटुंबातील सदस्यांकडून तसेच पोलीस कर्मचाऱ्यांकडूनही कौतुक केले जात आहे.

# छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त पालखी मिरवणूक व मूर्ती प्रतिष्ठापना सोहळा

## मुरुम शहरातील तरुणाईचे शंभुराजेंना अभिवादन

आरंभ मराठी / मुरूम





मुरुम शहरातील छत्रपती संभाजीनगर येथे छत्रपती संभाजी राजे ग्रुपच्या वतीने शिवपुत्र शंभूराजे यांच्या जन्मोत्सवानिमित्त भव्य पालखी सोहळा व मूर्ती प्रतिष्ठापना सोहळा बुधवारी (ता.१४) रोजी मोठ्या जल्लोषात आणि उत्साही वातावरणात पार पडला. या सोहळ्याची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज चौकातून झाली. येथे सर्वप्रथम छत्रपती संभाजी महाराजांच्या मूर्तीस अभिवादन करण्यात आले. त्यानंतर, शंभूराजेंची आकर्षक मूर्ती फुलांनी सजवलेल्या पालखीत ठेवून, भगवे झेंडे, टाळ, मृदुंग, तरुणांच्या हाती मशाली आणि हलगीच्या निनादात, महापुरुषांच्या जयघोषात शहरातील रस्त्यांवरून पालखी मिरवणूक निघाली. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते छत्रपती संभाजीनगर मार्गावर पायी प्रदक्षिणा करत ही मिरवणूक निघाली. छत्रपती संभाजीनगर येथे पालखी पोहोचल्यावर शिवपुत्र शंभूराजेंच्या सिंहासनारूढ मूर्तीची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. या प्रसंगी माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र बेंडकाळे व त्यांचे सहकारी, रोटरी क्लब ऑफ मुरुम सिटीचे अध्यक्ष कमलाकर मोटे व त्यांचे सर्व पदाधिकारी, राष्ट्रवादीचे नेते माजी प्राचार्य दत्ता इंगळे, शिवसेना नेते चंद्रशेखर मुदकन्ना, भाजप नेते श्रीकांत मिनीयार, मराठा सेवा संघाचे संजय सावंत व श्रीधर इंगळे, तसेच वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवर, माता-भगिनी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या अद्वितीय शौर्याचा, बलिदानाचा आणि स्वराज्यासाठी त्यांनी केलेल्या अतुलनीय त्यागाचा गौरव करताना त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. त्यांनी आपल्या मनोगतातून सांगितले की, छत्रपती संभाजी महाराज हे केवळ शूर योद्धे नव्हते तर उच्च नैतिकतेचे आणि विचारशक्तीचे अध्वर्यू होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी स्वराज्याची पताका उंचावून ठेवली. त्यांचे जीवन तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आहे, असे मनोगत श्रीकांत मिनियार, माजी प्राचार्य दत्ता इंगळे आणि छत्रपती संभाजी राजे ग्रुपचे सुरज शिंदे यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष कांबळे यांनी, सूत्रसंचालन सागर जगदाळे यांनी तर आभार उत्सव समितीचे अध्यक्ष सचिन शिंदे यांनी मानले. यंदाच्या छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सचिन शिंदे, उपाध्यक्ष ज्योतिबा शिंदे, खजिनदार वैभव भोसले यांच्यासह महेश शिंदे, सुरज शिंदे, आकाश शिंदे, सागर जगदाळे, गणेश जगदाळे, मंगेश शिंदे, राजाभाऊ शिंदे, अभी सूर्यवंशी, मल्लू तडकले, शुभम जाधव, रतन मुडे, शिवराज गिरीबा, भाग्यश चौगुले, अक्षय शिंदे, सुनील जाधव, सुमित शेळके, सतीश जाधव आदी पदाधिकारी व सदस्यांनी या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले. शहरात भरलेल्या या सोहळ्यामुळे संपूर्ण परिसर हरखून गेला होता, आणि नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागातून शंभू महाराजांप्रती असलेली निष्ठा आणि अभिमान दिसून आला.

# जिल्हा परिषद हायस्कूल सोसायटीला यंदा ७६ लाखांचा नफा

## चेअरमन पद्माकर मोरे यांची माहिती

आरंभ मराठी / उमरगा



उमरगा लोहारा व तालुका कार्यक्षेत्र असलेली व राज्यस्तरीय आदर्श सहकारी संस्था पुरस्कार प्राप्त जिल्हा परिषद हायस्कूल टीचर्स सोसायटीने अल्पावधीतच जिल्ह्यात तसेच राज्यात एक वेगळा आदर्श निर्माण केलेला आहे. या संस्थेस गेल्या आर्थिक वर्षात एकूण ७६ लाख रुपये निव्वळ नफा झाल्याची माहिती संस्थेचे चेअरमन पद्माकर मोरे यांनी दिली. सभासदांनी दरमहा २००० रुपये शेअर्स नियमित कपात करून कर्जाचा हप्ता सर्व सभासदांनी वेळेवर भरून संस्थेचा एनपीए झिरो करावा असे आवाहन यावेळी करण्यात आले. तेहतीस वर्षापूर्वी संस्थेचे संस्थापक चेअरमन कै. गोविंदराव साळुंके यांनी सुरू केलेल्या या संस्थेने आज नेत्रदीपक प्रगती केलेली आहे. स्थापनेपासूनच अर्ज द्या कर्ज घ्या या घोषवाक्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करत सोसायटीच्या संचालक मंडळाने अतिशय काटकसरीने व नियोजनबद्ध कारभार केलेला आहे. सभासदांच्या हिताच्या अनेक योजना राबवून नियमित कर्ज वसुलीने संस्थेच्या प्रगतीचा आलेख सतत उंचावत ठेवलेला आहे. पतसंस्थेचे ४९२ सभासद असून भाग भांडवल ३ कोटी ८२ लाख आहे. सभासदांच्या ठेवी ९ कोटी ८४ लाख, गंगाजळी १ कोटी ८७ लाख असून संस्थेने गेल्या आर्थिक वर्षात २५ कोटी ४२ लाखाची उलाढाल केली असून एक कोटी ४४ लाख रुपये उत्पन्न मिळाले आहे. सर्व तरतुदी, खर्च वजा जाता निव्वळ नफा ७६ लाख रुपये झाला असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. सभासदांच्या हितासाठी गुणवंत विद्यार्थी सत्कार, आवर्त ठेव योजना, सेवा निवृत्त सभासदांचा सन्मान, कन्यादान योजना, सभासदांचा मृत्यू झाल्यास संपूर्ण कर्जमाफ अशा वेगवेगळ्या योजना संस्था राबवत आहे. संस्थेने स्वत:च्या मालकीची नवीन आरोग्य नगर उमरगा येथे भव्य चार मजली इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. लवकरच इमारतीचे उद्घाटन करण्यात येईल अशी अपेक्षा चेअरमन पद्माकर मोरे यांनी व्यक्त केली. संस्थेच्या संचालक मंडळाने अतिशय काटकसरीने व जिद्दीने वसुली करून संस्थेचा एनपीए अतिशय कमी ठेवलेला आहे. भविष्यातही सभासदांसाठी चांगले निर्णय घेण्याचा मानस संस्थेच्या संचालक मंडळाने बोलून दाखवलेला आहे.

# प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी कार्यक्षमतेने काम करा

## जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांचे महसूल यंत्रणेला निर्देश

आरंभ मराठी / धाराशिव

महसूल प्रशासन हा जिल्हा प्रशासनाचा कणा असून, प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असलेल्या सेवा वेळेत आणि अचूक पद्धतीने पुरवणे ही जबाबदारी महसूल यंत्रणेवर आहे. त्यामुळे सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी अधिक कार्यक्षमतेने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी दिले. गुरुवारी (दि.१५) जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्ह्यातील विविध महसूलविषयक बाबींचा आढावा बैठक त्यांनी घेतला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, उपजिल्हाधिकारी शिरीष यादव, संतोष राऊत, प्रविण धरमकर, भुम उपविभागीय अधिकारी वैशाली पाटील, उमरगा उपविभागीय अधिकारी गणेश पवार, कळंब उपविभागीय अधिकारी संजय पाटील, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी निकिता साकळे, धाराशिव तहसीलदार डॉ.मृणाल जाधव, संबंधित नायब तहसीलदार व कर्मचारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी पुजार यांनी सांगितले की, महसूल प्रशासन हा जिल्हा प्रशासनाचा कणा असून, प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असलेल्या सेवा वेळेत आणि अचूक पद्धतीने पुरवणे ही जबाबदारी महसूल यंत्रणेवर आहे. त्यामुळे संबंधित सर्व अधिकाऱ्यांनी प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी अधिक कार्यक्षमतेने काम करावे,असे ते म्हणाले. बैठकीत ॲग्रीस्टॅक, पवनचक्की व सौरऊर्जा, दंडणिय प्रकरणे, नैसर्गिक आपत्ती अनुदान वाटप, ई-केवायसी शेतकरी आत्म हत्या प्रकरणे, ई-फेरफार,ई-चावडी, डी.एस.डी. डाटा साईन न झालेल्या ७/१२ चा अहवाल, ई-हक्क प्रणाली, ओडीसी अहवाल, जीवंत सातबारा मोहिम, कलम १५५ आदेश, शेतरस्ते, अर्धन्यायिक प्रकरणे, दहन-दफन भूमी आदी बाबींची प्रकरणे निकाली काढण्याबाबत विशेष चर्चा झाली. जिल्ह्यातील अनेक फेरफार प्रकरणे दीर्घकाळ प्रलंबित असल्याचे निर्दशनास आले असून, जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित तहसीलदारांना लवकरात लवकर प्रलंबित प्रकरणांचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले.



त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, फेरफारांची विलंबित नोंदणीमुळे नागरिकांना अनेक अडचणींचा साम ना करावा लागतो आणि हे सहन केले जाणार नाही. पुजार यांनी पुढे सांगितले की, दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे कलम ५४ ची प्रकरणे, संजय गांधी निराधार योजना,आस्थापना विषयक बाबी,आलेप विषयकबाबी,आपले सरकार पोर्टल/पी.जी पोर्टलवरील प्रलंबित तक्रारी,वसुली,गौण खनिज, भूसंपादन समन्वय विषयक बाबी, भुसंपादन प्रकरणी कमी जास्त पत्रके,मुख्यमंत्री सचिवालय कक्ष, पवनऊर्जा,प्रकल्पासाठी औद्योगिक प्रयोजनासाठी सनद देणे कामी प्रलंबित प्रकरणांची संख्या, अकृषिक वापर आकारणी व सनद, ई-ऑफिस आदी बाबींचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत जिल्हाधिकारी पुजार यांनी महसूल विभागाच्या प्रत्येक कामाचा सूक्ष्म आढावा घेतला आणि संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या. महसूल प्रशासनाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, पारदर्शकता, वेळेचे व्यवस्थापन आणि जनतेशी सुसंवाद या चार गोष्टी अत्यंत म हत्त्वाच्या असल्याचे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले. नागरिकांना सेवा पुरवताना कोणतीही दिरंगाई होणार नाही,याची दक्षता घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

## रविंद्र जाधव कोतापकर यांना विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार

आरंभ मराठी / मुंबई

मुंबई: संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगार हेच विकसित महाराष्ट्राचे खरे शिल्पकार असून त्यांच्या मेहनतीमुळेच महाराष्ट्राचा विकास शक्य झाला आहे. या कामगारांच्या सहभागाशिवाय देशाची, राज्याची प्रगती होऊ शकणार नाही, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी मंगळवारी केले.महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे ३६ वे कामगार भूषण पुरस्कार व विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कारांचे वितरण राज्यपालांच्या हस्ते कामगार क्रीडा भवनात करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी कामगार मंत्री आकाश फुंडकर, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, आ. मनोज जामसुतकर, आ. मनीषा कायंदे, प्रधान सचिव



आय. ए. कुंदन, कामगार आयुक्त डॉ. एच. पी. तुम्मोड, कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे आदी उपस्थित होते.रत्नागिरी जिल्यातील कोतापूर गावचे सुपुत्र आणि विचारे एक्सप्रेस अँड लॉजिस्टिकचे कर्मचारी यांना प्रदान करण्यात आला. तर, नोकरी करूनही विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा, संघटन क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्याबद्दल विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार (प्रत्येकी २५ हजार रुपये, स्मृतिचिन्ह व मानपत्र) देण्यात आले.

# मुरुड येथे शंभुराजे जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा

आरंभ मराठी / मुरूड

हिंदवी स्वराज्याचे धाकले धनी छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती मुरुड येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी ११ वाजता शंभूराजे चौकामध्ये छत्रपती शंभू राजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या नामाचा जयघोष करण्यात आला. त्यानंतर दुपारी चार वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकातून भव्य दिव्य अशा मि रवणुकीस सुरुवात झाली. या मि रवणुकीमध्ये हजारो शंभुराजे भक्त उपस्थित होते. या मिरवणुकीमध्ये एल वरती डान्स अकॅडमी च्या वतीने छत्रपती शंभूराजांच्या जीवनावर आधारित पथनाट्य सादर केले. तसेच ट्रॅक्टर मध्ये शंभूराजांच्या बलिदानाचा चित्ररथ तयार करण्यात आला होता.



### मिरवणूक वेळेवर संपन्न

सार्वजनिक छत्रपती शंभुराजे जयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेली भव्य दिव्य मिरवणूक ही शासकीय नियमानुसार वेळेवर पार पडली. या मिरवणुकीमध्ये मुरुड पोलिसांकडून मिरवणूक मार्गावर चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या मिरवणुकीमध्ये मुरुड पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, व पोलीस बांधव मोठ्या संख्येने बंदोबस्तासाठी उपस्थित होते.

## छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त गिरवली प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन



आरंभ मराठी / धाराशिव

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भूम तालुक्यातील गिरवली येथे गिरवली प्रीमियम क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर क्रिकेट स्पर्धे चे उद्घाटन परांडा भूम वाशी चे मा. आमदार राहुल मोटे यांचे बंधू युवा नेते ॲड.रणजित मोटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे व्हॉइस चेअरमन मधूकर मोटे प्रामुख्याने उपस्थित होते. गिरवली प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन राहुल भैय्या मोटे क्रिकेट क्लब व आनंद मित्र मंडळ गिरवली यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. क्रिकेट स्पर्धे च्या उद्घाटन प्रसंगी भूम, परंडा व वाशी तालुक्यातील अनेक क्रिकेट संघ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिराढोणच्या तिन्ही शाळांची उज्ज्वल यशाची परंपरा कायम

### दहावी बोर्ड परीक्षेच्या निकालात शाळांचे घवघवीत यश

आरंभ मराठी /शिराढोण

कळंब तालूक्यातील शिराढोण येथे पीएमश्री आदर्श जिल्हा परीषद प्रशाला, ख्वाजा नसिरोद्दीन माध्यमिक शाळा व सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय या शाळेतील इयत्ता इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे. जिल्हा परीषद प्रशालेचा निकाल १०० टक्के लागला असून या शाळेतील सलोनी पौळ ९०.२० टक्के, प्रतिक्षा माने ८८.६० टक्के, स्नेहल माळी ८७.८० टक्के, अंजली महाजन ८७.६ टक्के व सायली नान्नजकर हिने ८७.६० टक्के गुण घेवून यश मिळवले आहे. या शाळेतील विशेष प्राविण्यासह १० विद्यार्थी, प्रथम श्रेणीत १२ तर व्दितीय श्रेणीत १४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक सुनिल अहिरे, अर्जून जाधव, शिवलाल इनामदार, दत्तात्रय राठोड व मनिषा यादव यांनी मार्गदर्शन केले होते. ख्वाजा नसिरोद्दीन माध्यमिक शाळेचा निकाल ९३.१८ टक्के लागला असून, शाळेतील अशिष जेगावकर ८२.४० टक्के, संकेत महाजन ८१.४० टक्के, रुशिकेश जेगावकर ८१ टक्के, अरुष वाघमारे ७७.४० टक्के, अथर्व पालकर ७६ टक्के तर उर्दू माध्यमातून आयेशा आत्तार ७७.६० टक्के, झोया सय्यद ७६.६० टक्के, तहेनियत पठाण ७३.४० टक्के गुण मिळवून यशस्वी झाले आहेत. विशेष प्राविण्य ०७, प्रथम श्रेणीत २१, व्दितीय श्रेणीत ११ व तृतीय मध्ये ०२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या यशाबद्दल संस्थेचे सचिव डॉ.अफसर शेख, सलेम ान शेख, संस्थेचे अध्यक्ष संजय कुलकर्णी, मुख्याध्यापक गुणवंत घेगरे, पर्यवेक्षक राजेश ठोंबरे, अकबर सर सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयाचा निकाल ९६ टक्के लागला असून या शाळेतील राजलक्ष्मी पाटील ९६.८० टक्के, सिध्दी मुंदडा ९६.८० टक्के, श्रेया कुलकर्णी ९४.६० टक्के, समीक्षा खोडसे ९४ टक्के, अलिजा पठाण ९१.८० टक्के, संगीता यादव ९१.२० टक्के गुण घेवून घवघवीत यश मिळवले आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव आम दार विक्रम काळे, कोषाध्यक्ष अनिल काळे, मुख्याध्यापीका मिना ठाकूर व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले. तिन्ही शाळांनी उज्ज्वल यशाची परंपरा यंदाही कायम राखली आहे.

# महादेव नगर येथे दहावी-बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा

## मुरुम येथील विद्यार्थ्यांना यशस्वी भवितव्याच्या दिशेने मार्गदर्शन

आरंभ मराठी /मुरूड

मुरुम शहरातील महादेव नगर येथे ऑल इंडिया स्टुडन्ट फेडरेशनच्या वतीने बुधवारी (ता.१४) इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा महादेव मंदिराच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगरसेवक चंद्रशेखर मुदकन्ना होते. प्रमुख उपस्थितीमध्ये शिक्षक विजयकुमार फुगटे, ज्येष्ठ पत्रकार रफिक पटेल, गुरुकुल स्कूलच्या संचालिका मयुरी चौधरी, डॉ. प्रीती चिलोबा, पत्रकार नहिरपाशा मासूलदार, पत्रकार मोहन जाधव आदी मान्यवरांचा समावेश होता. कार्यक्रमाची सुरुवात शहीद भगतसिंग यांच्या



प्रतिमेस अभिवादन करून करण्यात आली.कार्यक्रमात मोहन जाधव, मयुरी चौधरी, डॉ. प्रीती चिलोबा, विजयकुमार फुगटे यांच्यासह विविध मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त करत विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावले. अध्यक्ष चंद्रशेखर मुदकन्ना यांनी अध्यक्षीय समारोप करत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. सर्व मान्यवरांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देताना सांगितले की, ''यशाचे खरे मोल म्हणजे मेहनत, चिकाटी आणि सातत्य. बोर्ड परीक्षेत मिळालेले यश हे केवळ सुरुवात आहे. पुढे असंख्य संधी तुमची वाट पाहत आहेत. योग्य दिशा आणि ध्येय निश्चित करून प्रामाणिक प्रयत्न केले तर यश नक्कीच पदरी पडेल. आईवडील, शिक्षक आणि समाजाचे मार्गदर्शन तुमच्या पाठीशी आहे. नव्या युगात स्वत:ची ओळख निर्माण करत समाजासाठी योगदान देणे हेच खरे शिक्षणाचे ध्येय आहे.'' कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन लखन भोंडवे यांनी तर आभार प्रदर्शन शहराध्यक्ष सागर धुमरे यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन लखन भोंडवे, सागर धुमरे, गणेश कडगंचे, आकाश च्यारे, ओंकार ओंबाटक्के, दीपक भोंडवे, समीर शेख, बसवराज पनाळे, रुद्र मुळे, निलेश सरसंबे, कपिल देडे, आदित्य फणेपुरे, अमर वाकळे, समर्थ अंबुरे आदी तरुण कार्यकर्त्यांनी परिश्रमपूर्वक केले.

## होर्टी येथील जमीनीची वारसाचा विचार न करता दस्त नोंदणी

आरंभ मराठी /तुळजापूर

तुळजापूर तालुक्यातील होर्टी येथील शेत जमिन गट नंबर ११६ मधील क्षेत्र १ हेक्टर ८१ आर जमीनीच्या वारसाचा विचार न करता दस्त नोंदणी केल्याबाबत दि.१५ मे रोजी तलाठी व मंडळ अधिकारी यांना राधा संतोष भोसले व मुलगा समर्थ संतोष भोसले यांनी फेर नोंद घेवू नये असा तक्रारी अर्ज दिला आहे. तुळजापूर तालुक्यातील मौजे होर्टी येथील शेत जमीन गट नंबर- ११६ मध्ये महादेव शिवाजी गायकवाड रा. चिकुंद्रा येथील रहिवासी असुन यांनी राधा यांचे पती संतोष लक्ष्मण भोसले यांना दारु पाजुन व नशा पाणी करुन मौजे होर्टी येथील शेत जमीन गट नंबर-११६ क्षेत्र ० १' हेक्टर ८१ आर ऐवढी जमीन खरेदी करुन घेतली आहे. सदरील जमीन ही वडीलोपार्जीत आहे. यामध्ये राधा यांचा व त्यांच्या कुटुंबातील वारसांचा जराही विचार अथवा सही घेतलेली नाही. सदरच्या जमीनीवर त्यांची उपजिवीका असल्याचे त्यांनी अर्जात नमूद केले आहे. महादेव शिवाजी गायकवाड यांनी याचा विचार न करता सदरची जमीन त्यांचे पती संतोष लक्ष्मण भोसले यांना दारु पाजुन कवडीमोल किमंतीत खरेदी केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तरी तहसिलदार अरविंद बोळंगे व मंडळ अधिकारी, तलाठी यांनी सदरील जमीनीची खरेदी ही बेकायदेशीर केलेली असुन फेर नोंद घेवून नये, दोषी व्यक्ती, खरेदी घेणार व साक्षीदार यांच्यावर योग्य ती कार्यवाही करुन जमीन मला परत मिळावी व मला योग्य तो न्याय द्यावा अशी लेखी तक्रार देण्यात आली आहे.

## कारची मोटारसायकलला धडक; तरुणाचा मृत्यू

आरंभ मराठी /धाराशिव

भरधाव कारने मोटार सायकलला जोराची धडक दिल्यामुळे या अपघातात तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. हा अपघात आळणी पाटी रस्त्यावर झाला. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, विशाल रमेश भुतेकर (वय २८ वर्षे, रा. सांजा ता. जि. धाराशिव) हा तरुण दिनांक १३ मे रोजीमोटरसायकल (क्र एमएच १३ एबी ३४२९) वरुन येडशी येथुन धाराशिव कडे जात होता. दरम्यान आळणी पाटीच्या जवळ असणाऱ्या जिओ पेट्रोपंपाच्या समोरील एनएच ५२ हायवे रोडवर ईको कार (क्र टीएन ८१एवाय ८७९७) चा चालक आरोपी राजेश कार्तिकेयन (रा. १८/२०७ वेस्ट स्ट्रिट मनचनाल्लुर, पोस्ट थिरुप्पत्तुर, ता. मनचनालूलुर, जि. तिरुचिरापल्ली, राज्य तामीलनाडु) याने त्याच्या ताब्यातील कार ही हायगयी व निष्काळजीपणे चालवून विशाल भुतेकर याच्या मोटरसायकलला धडक दिली. या अपघातात विशाल भुतेकर हा गंभीर जखमी होवून मयत झाला. फिर्यादी चेतन रमेश भुतेकर (वय २४ वर्षे, रा. यशवंतनगर सांजा) ता. जि. याने दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे भा.न्या.सं. कलम २८१, १२५(अ),१२५(ब), १०६(१) सह कलम १८४,१८७ मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## एकोंडी येथील संजीवनी मॉडर्न इंग्लीश स्कूलचा दहावीचा निकाल शंभर टक्के

आरंभ मराठी / उमरगा

उमरगा तालुक्यातील एकोंडी येथील संजीवनी मॉडर्न इंग्लीश स्कूलचा दहावीच्या परीक्षेत शंभर टक्के निकाल लागला आहे. या शालांत प्रमाणपत्र परीक्षेत यशस्वी विद्यार्थी श्रावण पुजारी ८९%, प्रतीक राठोड ८१.२०%, गणेश हिप्परगे ७९.४०%, चैतन्य मुळे ७९.४०%, प्रेम नक्टाळे ७९.२०% आणि अंशुमन कांबळे ७६% यांचा सत्कार करण्यात आला.सलग दुसऱ्या वर्षी ही शाळेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन प्राचार्य जीवनमाला आळंगे, सुधाकर जाधव, शरयू पोतदार, माधव माने यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुयश कांबळे तर आभार लक्ष्मीकांत मुलगे यांनी केले.

## शिराढोण येथे वीर महाराणा प्रतापसिंह जयंती साजरी

आरंभ मराठी / शिराढोण

कळंब तालुक्यातील शिराढोण येथे गावातील मान्यवरांच्या उपस्थितीत वीर शिरोमणी महाराणा प्रताप जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. जयंती निमित्त महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर ध्वजारोहणही करण्यात आले. जयंती उत्सवात गावातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती



## आरोही राऊत हिचा नरेंद्र पाटील यांच्या हस्ते सत्कार

आरंभ मराठी / धाराशिव

शहरातील यशवंतराव चव्हाण विद्यालयातील विद्यार्थिनी आरोही खंडू राऊत हिने एमटीएस परीक्षेत यश संपादन केले असून, तिच्या यशाबद्दल मराठा क्रांतीसूर्य स्व .आमदार अण्णासाहेब पाटील यांचे सुपुत्र अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास म हामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी सत्कार केला. तिच्या यशाबद्दल कौतुक करून पाटील यांनी शुभेच्छा दिल्या.यावेळी खंडू राऊत यांच्यासह मित्र परिवार उपस्थित होता.



## धाराशिव शहरात आज भीमगीतांची मैफल

आरंभ मराठी / धाराशिव

धाराशिव शहरात आज (दि.१६) भीमगीतांची मैफल रंगणार आहे. विश्वभुषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती समिती २०१९ संचलित २०२५ धाराशिवच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महाकारुणिक तथागत गौतम बुद्ध याच्या सयुक्त जयंती निमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक साजन - विशाल यांचे सादरीकरण यावेळी होणार आहे. आज सायंकाळी पाच वाजता जिल्हा परिषद उच्च म ाध्यमिक कन्या प्रशाला (मल्टी पपंज हायस्कूल) शहर पोलीस स्टेशन जवळ हा कार्यक्रम होणार आहे. तरी या भीम गीतांच्या बहारदार कार्यक्रमासाठी शहरातील नागरिकांनी सहकुटुंब उपस्थीत राहावे असे आवाहन आयोजक संग्राम बनसोडे, सोमनाथ गायकवाड आणि उदयराज बनसोडे यांनी केले आहे.

# परिचारिका दिन जिल्हा शासकीय रुग्णालयात साजरा

आरंभ मराठी / धाराशिव

जागतिक नर्सिंग दिन सोमवारी (दि.१२) जिल्हा शासकीय सर्वसामान्य रुग्णालय धाराशिव येथे साजरा करण्यात आला. यावेळी फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. अग्रगण्य परिचारिका, लेखक व संख्या शास्त्रज्ञ असलेल्या फ्लोरेन्स नाइटिंगेल यांनी इ.स.१८५३ साली झालेल्या क्राइमियन युद्ध दरम्यान जखमी सैनिकांची सुश्रुषा केल्याबद्दल त्यांना प्रसिद्धी मि ळाली. त्यांना ''लेडी विथ द लॅम्प'' असेही म्हणतात.या दिनाचे औचित्य साधुन मधुन पुढील उच्च शिक्षणासाठी पाठवण्यात आलेल्या परिचारिकांना जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकुरकर,रुग्ण कल्याण समिती सदस्य अब्दुल लतिफ,गणेश वाघमारे,तसेच आरोग्य मित्र




रौफ शेख यांच्या वतीने विशेष सन्मान देण्यात आला. ज्यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात मिळवलेल्या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचा सन्मान चिन्ह आणि प्रशस्तीपत्र प्रदान करुन त्यांच्या मेहनतीचा गौरव करण्यात आला.या उपक्रमामुळे परिचारिकांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रगतीला प्रोत्साहन मिळाले. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या यशस्वी वाटचालीस शुभेच्छा देत परिचारिकांच्या शिक्षणासाठी रुग्णालयाने उचललेल्या पावलांचे कौतुक केले. हा दिवस परिचारिकांच्या मेहनतीला ओळख देणारा आणि त्यांना अधिक प्रोत्साहित करणारा ठरला. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ धनंजय चाकुरकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ तानाजी लाकाळ, शासकीय महिला रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षका डॉ स्मितताई गवळी, डॉ.फ ुलारी,नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य मुजावर,रुग्ण कल्याण समिती सदस्य अब्दुल लतिफ, तालुकास्तरीय बाल संरक्षण समिती तथा इथिकल कमिटी सदस्य गणेश वाघम ारे,आरोग्य मित्र रऊफ शेख, अधिसेविका सुमित्रा गोरे,सुवर्णा देशमुख,सुरेखा गवई,संगिता फड,सह इतर उपस्थित होते.

## गोविंदपूर येथील सरस्वती विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

आरंभ मराठी / गोविंदपूर

कळंब तालुक्यातील गोविंदपूर येथील सरस्वती विद्यालयाचा निकाल ९७.०५% टक्के लागला.

फेब्रुवारी/मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या बोर्ड परिक्षेत सरस्वती विद्यालय गोविंदपूर या शाळेतील विद्यार्थीनी कु. आपेक्षा बबन मुंडे हिने ९४.४०% गुण घेवून शाळेतून व मंगरूळ येथील परिक्षा केंद्रातून प्रथम क्रमांक पटकावला. तसेच दत्ता विष्णू मुंडे याने ९०.८०% गुण घेवून शाळेतून व्दितीय क्रमांक मिळवला तर गायत्री कृष्णा मेणकुदळे हिने ८९.८०% गुण घेवून तृतीय क्रमांक मिळवला. शाळेतील १४ विद्यार्थी विशेष प्राविण्यात तर १३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत व ५ विद्यार्थी व्दितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने शाल श्रीफळ, फेटा बांधून, पुष्पहार व पुष्प गुच्छ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव वैभव



उमाकांत मुंडे, शाळेचे मुख्याध्यापक बन्सी हरीभाऊ शेळके, शिक्षक बाळू विठ्ठल सावंत, हिरालाल भागवत मुंडे, शाहूराव नरहरी राऊत, बालाजी सुरवसे, शिक्षकेत्तर कर्मचारी जनार्धन सुरवसे, सुरेखा मस्के व विद्यार्थ्यांचे आईवडील उपस्थित होते. कार्यकमाचे सुत्रसंचालन हिरालाल मुंडे यांनी केले. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक वर्गातून व ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.